# पुणे विद्यापीठ

## सहायक वसतीगृहप्रमुख पदभरती

पुणे विद्यापीठातील मुले आणि मुली यांच्या वसतीगृहाकरिता सहायक वसतीगृहप्रमुखांची २ पदे विद्यापीठ निधीतून दोन वर्षे कालावधीकरिता सरळसेवेने भरण्यासाठी पात्र उमेदवारांनी दिनांक २२/०३/२०१३ ते दिनांक ०८/०४/२०१३ या कालावधीत ऑनलाईन अर्ज भरावयाचे आहेत . विहित नमुन्यात ऑनलाईन भरावयाचा अर्ज पुणे विद्यापीठाच्या **http://recruitment.unipune.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| पदनाम व वेतन | पदसंख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| सहायक वसतीगृहप्रमुख (मुले/मुली) दरमहा रु. २०,०००/- एकत्रित वेतन. | २ | खुला - १<br>अनु.जाती - १ | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२. वरिष्ठ अथवा कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षक म्हणून अध्यापनाचा किमान तीन वर्षांचा अनुभव असणे आवश्यक.<br>**अथवा**<br>२. कार्यालयीन कामकाजातील प्रशासकीय कामाचा कमीत कमी तीन वर्षांचा अनुभव आवश्यक. |

## सर्वसाधारण सूचना

- **अर्ज शुल्क व अर्ज स्वीकारण्याचा दिनांक :**

ऑनलाईन अर्ज दिनांक २२/०३/२०१३ ते दिनांक ०८/०४/२०१३ या कालावधीत भरुन त्याची प्रिंट आऊट घेऊन स्वाक्षरीसह एक प्रत आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या सांक्षाकित प्रती नजिकच्या काळातील पासपोर्ट आकाराचे स्वतःचे छायाचित्र चिकटवून आणि मा. कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यांचे नांवे काढलेला राष्ट्रीयकृत बँकेचा खुल्या प्रवर्गासाठी रु.३००/- व राखीव प्रवर्गासाठी रु. १५०/- चा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) सह खालील दिलेल्या दिवशी व वेळेत प्रत्यक्ष मुलाखतीसाठी आपल्या मूळ कागदपत्रांसह उपस्थित रहावे.

| पदाचे नांव | मुलाखतीचा दिनांक | मुलाखतीची वेळ | मुलाखतीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| सहायक वसतीगृहप्रमुख (मुले/मुली ) | १६ एप्रिल, २०१३ | सकाळी ११.०० वाजता | सेट गेस्ट हाऊस,<br>आयुका रोड,<br>पुणे विद्यापीठ, गणेशखिंड,<br>पुणे - ४११ ००७. |

- **वयोमर्यादा :**

सदर पदासाठीची वयोमर्यादा किमान २५ वर्षे व कमाल ४५ वर्षे राहील.

- **लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन :**

१. शासनाने शासकीय विभागातील गट-अ,ब,क आणि ड मधील पदांच्या सेवाप्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५, दिनांक २८ मार्च, २००५ च्या अधिसूचनेव्दारे लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन विहित केले आहे. या नियमांतील तरतूदीनुसार शासकीय सेवेतील पदासाठी अर्ज करताना अर्जासोबत उमेदवाराने विहित नमून्यातील प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे.

२. प्रतिज्ञापनात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या २ पेक्षा अधिक असेल तर दि. २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यात येईल.

- **इतर सूचना**

१. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीस पात्र आहे अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविली असल्याचे आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

२. मुलाखतीस उपस्थित राहताना उमेदवारांनी अर्जासोबत खालीलप्रमाणे प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

अ) पदवी व पदव्युत्तर परीक्षेची गुणपत्रिका/प्रमाणपत्र.

ब) अनुभवाचे प्रमाणपत्र.

क) नियोक्त्याचे मूळ ना हरकत प्रमाणपत्र.

ड) वयाबाबत जन्मतारखेचा दाखला/एस.एस.सी.चे प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला.

इ) नावातील बदलाबाबत शासन राजपत्र/विवाहनोंदणी प्रमाणपत्र.

ई) धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) (खुल्या प्रवर्गासाठी रु.३००/- व राखीव प्रवर्गासाठी रु. १५०/-)

३. अर्ज भरावयाच्या अंतिम दिनांकास वयोमर्यादा व अनुभव गणला जाईल.

४. सध्या सेवेत असलेल्या उमेदवारांनी त्यांचा अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीने विहित मार्गाने सादर करावा.

५. सदर पदाकरिता पोस्टाने अथवा इतर माध्यमातून प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

६. ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास व अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

७. अर्जदाराने अर्ज करतेवेळी शैक्षणिक पात्रता, अनुभव, आरक्षण या बाबी विचारात घेऊन अर्ज ऑनलाईन भरावा.

८. या भरती प्रक्रियेसंदर्भात या कार्यालयाकडून वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती व सूचना विद्यापीठाच्या **http://recruitment.unipune.ac.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उमेदवाराने वरील संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी पहावी.

९. भरती प्रक्रियेच्या संबंधित अधिकारी व सेवकांवर उमेदवाराने कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास, अशा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

१०. विहित ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त अन्य पध्दतीने केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

११. जााहिरातीमध्ये नमूद केलेले पद भरण्याचा/न भरण्याचा हक्क विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

जाहिरात क्र, ०८
दिनांक : २२ मार्च, २०१३

**( डॉ. नरेंद्र कडू )**
**कुलसचिव**